भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०२/२०१८

**१) घरातील नगदी पैसे व सोन्या–चांदीचे दागीण्यांची चोरी. :–**

दिंनाक १६/२/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी अशोक गोपालराव बांते वय ४५ वर्ष, रा. महालगाव याचा मुलगा कुंदन हा त्याचे घराचे समोरील दाराची साखळी लावुन मंदीरात गेला होता व मंदीरातुन घरी परत आल्यावर घराचे दार उघडे दिसले व बेडरुम मधील लोखंडी आलमारीचा १ पल्ला उघडा होता व समोरील कपाटातील सामान अस्त व्यस्त पडलेले होते, फिर्यादीचे पत्नीने कपाटाचे लॉकर मध्ये ठेवलेल्या स्टिलचे डब्यामध्ये नगदी ७,०००/–रु. सोन्याची एकदानी १ तोडा, २.५ ग्रॅम सोन्याची नथ, ३ ग्रॅम सोन्याची अंगठी, १ ग्रॅम सोन्याचा लॉकेट, चांदीच्या पायपट्टया, लहान मुलाचा चांदीचा कळदोडा असा एकुण ३५,९००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने घराचे समोरील दाराची साखळी काढुन आत प्रवेश करुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३८०,४५४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील पोउपनि. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**२) विद्युत मोटार पंपाची स्टेटर व वायरची चोरी :–**

दिंनाक १५/२/२०१८ चे ०६.३० वाजता ते दि. १६/०२/२०१८ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नागशेन शिवदास देशभ्रतार वय ४३ वर्ष, रा. दिघोरी (सिंगोरी) याचे शेताला लागुन असलेल्या नाल्यावर लावुन ठेवलेली एसबीआय कंपनी ची ५ हार्स पावरची विद्युत मोटार पंप तोडुन त्यातील स्टेटर किंमती ३,०००/–रु, वायर किंमती १,०००/–रु. असा एकुण ४,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिंनाक १०/२/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी याची अल्पवयीन मुलगी हिला यातील आरोपीने फुस लावुन आपले घरी पळवुन नेल्याचे फिर्यादीची लेखी रिपोर्ट एसडीपीओ कार्यालय भंडारा येथुन टपाला व्दारे पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील सफौ. खोंडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) नरबळी जादुटोना विरोधी कायदा अन्वये गुन्हा नोंद :–**

दिंनाक १५/२/२०१८ चे १९.०० वाजता ते दि. १६/०२/२०१८ चे ०४.०० वाजता पर्यत यातील आरोपी क्र. १ ते ७ यांनी फिर्यादीस सानगडी येथे बोलावुन सासरा येथे एका शेतकऱ्याचे शेतात गुप्त धन आहे ते आम्ही काढु शकतो त्या करीता पुजा – अर्चनासाठी फिर्यादी व त्याचे इतर सोबत्याकडुन नगदी ११००/–रु. घेवुन त्या रक्कमेतुन पुजा अर्चनेचा सामान खरेदी करुन घटना स्थळी आरोपी क्र. ६ व ७ यांचे घरुन खोदकामाचे साहीत्य बोलावुन घटना स्थळी शेतात पुजा अर्चना करुन शेत जमीनीत असलेला काळा दगड बाजुला केला परंतु कोणतेही गुप्त धन मिळुन न आल्याने फिर्यादी यास आपली फसवणुक झाली, असे समजल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २(१)(ख)(२)(४)नरबळी जादुटोना विरोधी कायदा सन २०१३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पिपरेवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान तरुणाचा मृत्यु :–**

दिनांक १४/०१/२०१८ चे २०.३० वाजता. यातील मृतक हिवराज कृपानंद लांडगे वय २० वर्ष, रा. कोदामेळी याने त्याचे राहते घरी विषारी औषध प्राशन करुन उल्टया करित असल्याने व उल्टीचा वास येत असल्याने त्यास उपचाराकरीता ग्रारु. लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे लाखांदुर जाक्र. ३९७/१८ दिनांक १५/०२/२०१८ अन्वये मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. ची मर्ग डायरी प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी सैनीक ईश्वर हटवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पो.स्टे. दिघोरी हे करीत आहेत.

**६) गळफास लावुन महिलेचा मृत्यु :–**

दिंनाक १६/२/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. मिना दिपक गेडाम वय २८ वर्ष रा. गायडोंगरी ही दि. १४/०२/२०१८ पासुन प्रकृती बरी नसल्याने तिने आज घरी कोणी हजर नसतांना आपले राहते घराचे छपाराचे आडवे फाटयाला नॉयलॉन चा दोर बांधुन गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी दिपक ईश्वर गेडामवय ३० वर्ष, रा. गायडोंगरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. राहांगडाले पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक २१/११/२०१७ चे ०८.३० वाजता दरम्यान यातील मृतक मनोज जलाकराम गोस्वामी वय ५० वर्ष, रा. गजानन नगर ६३ साई नगर पाण्याच्या टाकी जवळ हा आपली बहीनी भंडारा येथे पाहुणा म्हणुन आला होता तेथे जास्त प्रमाणात दारुचे सेवन केल्याने दिनांक २४/११/२०१७ ला २१.३० वा. दर. प्रकृती खराब झाल्याने त्यास डॉ. निर्वाण हॉस्पीटल भंडारा येथे उपचार सुरु असतांना नागपुर येथे रेफर केल्याने त्यास दिनांक ०९/१२/२०१७ ला मेयो हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. तहसिल नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ क. १७४ जाफौ चे कागदपत्र आवक क्र. ४८०/१८ दिनांक १६/०२/२०१८ नुसार पो. स्टे.ला प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. भोयर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन. भंडारा हे करीत आहेत.

**८) अवैध दारु /जुगार अड्डयांवर धाडी . :–**

दिनांक १६/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, वरठी, तुमसर, गोबरवाही व साकोली येथे अवैध दारू /जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९१ लिटर हातभंट्टी दारू+ २९० किलो सडवा मोहा+साहित्य १ मोटार सायकल कि. २९,३३०/रु. व १ लिटर ८९० मिलीलीटर देशी दारू किमती ५७०/रु. तसेच जुगारातुन १७३/रु. असा एकुण ३०,०७३ /रु. चा माल जप्त करण्यात आला.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १६/०२/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनाकरीता ११ ईतर वाहनांवरती – ७९ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.